RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 April, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 April, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : दहावा | एप्रिल २०१७



मनावर विजय प्राप्त करा (महाराज सावनजींचे पत्र) 5

नामच सर्वकाही आहे (सत्संग) 9

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 19

दलदल (गोष्टीरुपात संदेश) 31

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

सावन गुमदा गुमदा गुम होया

१. सावन गुमदा–गुमदा, गुम होया,
चंगा साऊ ओह जीव करतार दा सी, (२)

२. मुसलमान इसाईयां ते, हिन्दुआं नूं
नाले सिक्खां नूं वी सतकार दा सी, (२)

३. हर घड़ी सरबत दा, भला मंगदा
कदे किसे नूं वी ना ही मार दा सी, (२)

४. नक्श नैण सोहणे अते, उम्र वड्डी,
'अजायब' उस नूं सावन पुकार दा सी, (२)

मनावर विजय प्राप्त करा

बाबा सावन सिंहजी महाराजांद्वारे एका प्रिय सत्संगी महिलेस लिहीलेले पत्र
ब्यास, भारत - १ ऑगस्ट १९१२

माझ्या प्रिय मुली,

तुझे प्रेम आणि श्रद्धापूर्वक लिहिलेले पत्र मला मिळाले. तुझ्या नवीन घरी तू स्थानांतरीत होत असल्याने, तुझ्या ध्यान-अभ्यासावर परिणाम झाला, तरीही तू आंतरिक उन्नती चांगल्या पद्धतीने करीत आहेस हे जाणून मला खूप आनंद झाला. परमपिता परमात्म्याच्या कृपेने तुला सुखदायी घर मिळाले असून तुझी प्रापंचिक चिंता मिटलेली आहे. त्यामुळे तू सर्वोतोपरीने परमपिता परमात्म्याच्या आराधनेमध्ये स्वत:स झोकून द्यावयास हवे. तुझ्या दैनंदिन कामकाजामधून जेवढा वेळ तुला सहजतेने ध्यान-अभ्यासासाठी काढता येईल, तेवढा वेळ तू काढ, पण सोबत ही देखील दखल घे की, तुझ्या कामकाजावर त्याचा परिणाम होऊ नये.

या जगातील सर्व ऐषोआराम तसेच स्वत: हे जग, सूर्य, चंद्र, तारे, जे काही आपण पाहत आहोत ते सर्वच, नाशिवंत आहेत. केवळ आत्माच अमर आहे. हे लहानसे जीवन अशा पद्धतीने जग, ज्यायोगे परमात्मा तुझ्यावर प्रसन्न होईल, तुझा या जगामधील जन्म-मृत्युरूपी ये-जा थांबेल आणि तुला तुझे अविनाशी घर सचखंड मिळेल जेथे फक्त निर्मळ आनंद आहे.

ध्यान-अभ्यासात बसण्याच्या बाबतीत तू लिहिले आहेस की, एकाच आसनात जास्त वेळ बसणे तुला जमत नाही. त्यासाठी तू उशीचा वापर करण्यास हरकत नाही. सस्मासला सांगून, तू स्वत:साठी एक बैरागन बनवून घे. बैरागन म्हणजे एका सरळ लाकडाच्या तुकड्याच्या टोकास दुसरा लहानसा लाकडाचा तुकडा जोडला जातो. त्यामुळे 'T' आकाराची बैरागन तयार होते. यासाठी दीड फूट उंच दोन इंची रुंद लाकडी तुकडा वापरला जातो आणि त्याच्या वरच्या टोकावर मधोमध दुसरा छोटा लाकडी तुकडा जोडला जातो, ज्याचा आपल्या दोन्ही हाताच्या कोपरांना ध्यान-अभ्यास करताना आधार मिळतो.

आपण आपला जास्तीत जास्त वेळ जगरहाटीमध्ये व्यतीत करतो व ध्यान–अभ्यासासाठी काही तासच देतो. त्यामुळे आपला आत्मा त्या पवित्र शब्दाच्या ध्वनीचे रसपान मनसोक्तपणे करू शकत नाही. आपले मन वारंवार बाहेर येते आणि या जगातील वस्तूंचा विचार करीत राहते. त्यामुळे तू स्वत:च्या दिवसभराच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेव आणि काळजी घे की तुझ्या मनाने तुला प्रापंचिक वस्तूंमागे वाहून नेऊ नये.

प्रापंचिक इच्छांना आवर घालण्याचा प्रयत्न कर. तसेच बाह्य जगाकडे आकर्षित होणाऱ्या इंद्रियांवर ताबा ठेव. नेहमी स्वत:चे लक्ष एकाग्र कर आणि तुझ्या मनास फालतु कल्पनांमध्ये गुंतू देऊ नकोस. तुला हे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा तू तुझ्या मनास शब्द–नामाशी जोडून ठेवशील. वेळोवेळी चालता–फिरताना, खाता–पिताना किंवा इतर कोणतेही काम करताना ज्यामध्ये तुला विशेष लक्ष देण्याची गरज नसेल, त्यावेळी पवित्र नामाचा जप करण्यात तुझे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न कर. सदैव सतर्क रहा, इतरत्र लक्ष भरकटू देऊ नकोस. मनावर नियंत्रण मिळविण्याचा हाच एक मार्ग आहे.

कुणाही मनुष्याद्वारे किंवा एखाद्या वस्तूद्वारे तुझे जे काही चांगले किंवा वाईट होत असेल, ते आपल्या प्रिय परमपित्याच्या मर्जीनुसारच होत असते. सर्व माणसे, सर्व वस्तू ही परमात्म्याची साधने आहेत. तुझ्या बाबतीत जर एखादी वाईट घटना घडत असेल तर तू असा विचार कर की ही परमात्म्याची खूप मोठी कृपा आहे.

आपणांस आपली पूर्व कर्मे भोगावीच लागणार आहेत, मग ती आपण आता भोगावीत वा नंतर. आपणांस भविष्यात भोगावी लागणारी दु:खे–वेदना, आपणाकरवी लवकरात लवकर भोगली जावीत अशी आपल्या सतगुरुंची इच्छा असते. ते आपल्या कर्मांचे ओझे लवकरात लवकर हलके करू इच्छितात. हे तर कर्मांचे कर्ज आहे. आपणांस जर एक टन वजना एवढे कर्म भोगावयाचे असेल, तर आपण केवळ एक पाऊंड वजनाएवढे भोगून त्यापासून आपली सुटका होत असते. तुला जर कठीण व वेदनामय कर्मे

भोगावी लागत असतील, तर तू विचलीत होऊ नकोस. हे तुझ्या भल्यासाठीच होत आहे. तुझी काहीच चुकी नसताना, एखादी व्यक्ती तुझ्याशी अन्यायी वर्तन करीत असेल, तर त्या वर्तणुकीमागे आपल्या सतगुरुंचाच हात आहे असे समज. तुझा अहंकार नष्ट झाला आहे की नाही? हे सतगुरु अजमावून पाहत असतात. तुझ्या अंतरात नम्रता आणि प्रेमाची मुळे किती घट्टपणे रुजलेली आहेत? हे सतगुरु पाहू इच्छित असतात.

विचार करून पहा! जर एखाद्या मनुष्याने त्याचा मुलगा गमावला तर त्याचे या जगातील नातेसंबंध कमी झाले की नाही हे पारखण्यासाठी तसे घडलेले असते. आपले परमपिता या जगात आपणांस जखडून ठेवणाऱ्या मजबूत साखळदंडातून आपली सुटका करू इच्छित असतात. या जगातील नातलगांवर जास्त प्रेम असण्याचा अर्थ असा होतो की आपले सतगुरुंवर कमी प्रेम आहे.

घडणाऱ्या सर्व घटना ज्या आपणांस दुर्भाग्यशाली वाटतात, त्या वास्तवात तशा नसतात. त्या घटना आपले शुद्धीकरण, आपल्या कर्मांचे ओझे हलके करण्यासाठी असतात तसेच त्या आपली सहनशक्ती वाढवितात आणि आपणांस अधिक चांगला मनुष्य बनवितात. तू नेहमी ईश्वराच्या इच्छेच्या आधीन राहून त्यामध्ये समाधान मानत जा. परमपिता परमात्मा जे काही करतो, ते आपल्या भल्यासाठीच करत असतो.

या जगामध्ये जे लोक स्वत:ची आंतरिक प्रगती करण्यासाठी कार्यरत असतात, त्यांना नेहमीच मन आणि विषय या दोन शक्तीशाली शत्रूंना सामोरे जावे लागते. ते आपल्या मार्गामध्ये अनेक अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जर आपल्या बाबतीत एखादी वाईट अघटित घटना घडली तर आपण निराश होता कामा नये. उलट आपल्या अंतर्यात परमात्माप्रती दुप्पट प्रेम निर्माण व्हावयास हवे, कारण अखेरीस आपलाच विजय होईल.

आपले परमपिता प्रेमाचे सागर असून आपण त्या सागरातील थेंब आहोत. या विशाल विश्वाची यंत्रणा निरंतर प्रेम या तत्त्वावर आधारीत

असल्याने तू प्रेमाच्या तत्त्वाच्या अनुरूप होण्याचा प्रयत्न कर. सतगुरुंप्रती जेवढे सखोल प्रेम तुझ्या अंतरात असेल, तेवढे या जगाप्रती तुझे प्रेम कमी व फिके असेल. या जगाप्रती असलेल्या प्रेमाची जागा सतगुरुंचे प्रेम घेईल. त्यानंतर तुझ्या शरीरातून आत्मा बाहेर पडू लागेल. एक-एक करीत तुझ्या अंतर्यातील पडदे उघडू लागतील. संसाराच्या गूढ रहस्याचे आकलन तुला होईल आणि तू तुझ्या प्रिय परमपिता परमात्म्याच्या मांडीवर बसशील. त्यांच्याशी तू एकरूप होशील.

परमपिता परमात्म्याने कृपा करून तुला ही पवित्र देणगी दिलेली आहे या देणगीची तुलना जगातील कोणत्याही खजिन्याशी होऊ शकत नाही. तू जर ध्यान-अभ्यास केला नाहीस, तर तुझी आंतरिक प्रगती होणार नाही. समोर पडलेल्या अन्न-पदार्थांची केवळ मोजदात केल्याने मनुष्याची भूक भागत नाही. तुला जी काही शिकवण मिळालेली आहे ती अनमोल आहे. परंतु जोपर्यंत त्या शिकवणुकीनुसार तू वाटचाल करीत नाहीस, त्यावर अमल करीत नाहीस तोपर्यंत तुला तिचा फायदा होणार नाही. दररोज, तुझ्या प्रापंचिक कामकाजामधून जेवढा जास्तीत जास्त वेळ तुला ध्यान-अभ्यासाकरता देता येईल, तेवढा नक्की दे.

सारांश म्हणून तू खालील गोष्टी लक्षात ठेव :

१) मनावर नियंत्रण,
२) विषय-विकारांपासून दूर राहणे,
३) परमात्म्याच्या मर्जीत राहणे,
४) सतगुरुंवर प्रेम,
५) नित्यनेमाने ध्यान-अभ्यास.

अशी पत्रे तू तुझ्या मार्गदर्शनासाठी सांभाळून ठेवावीत. त्यांना नष्ट करू नयेस.

तुझा प्रिय
सावन सिंह

नामच सर्वकाही आहे

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू रामदासजी महाराजांची वाणी
रिबोला, इटली – २४ मे, १९८९

बंधूंनो, नीट लक्षपूर्वक सत्संग ऐका. आपल्या समोर गुरू रामदासजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे. संत–महात्मांची वाणी अर्थगौरव व मौल्यवान असून तिचा अर्थ नीट समजून घेणे महत्वाचे असते.

गुरू रामदासजींच्या बालपणीच त्यांचे आई–वडील निधन पावले होते. ते खूप सत्यवादी होते. बालपणापासूनच त्यांनी उकडलेले चणे विकून आपला उदरनिर्वाह केला. गुरू रामदासांस गुरू अमरदेवजींची सुपुत्री बीबी भानीशी विवाह करण्याचे सौभाग्य संपन्न झाले.

हिंदूस्थानात आजही हुंडा घेण्याची प्रथा प्रचलित आहे. ही प्रथा पूर्वीच्या काळी देखील खूप प्रचलित होती. जेव्हा गुरू रामदासाजींच्या लग्नाचे विधी संपन्न झाल्यानंतर गुरू अमरदेवजी महाराजांनी रामदासजींना म्हटले,''आमच्या भल्ला घराण्यात अशी प्रथा आहे की आम्ही मुलीला लग्नात हुंडा देतो. तू जे काही हवं असेल ते माग, जे मागशील ते तुला देऊन खूष केले जाईल.'' रामदासजींचा आत्मा अत्यंत पवित्र होता. ते म्हणाले, ''मला कोणतीही सांसारिक वस्तू नको. जर तुम्ही दया करून मला काही वस्तू देऊ इच्छित असाल तर मला नामदान द्या. **नामच सर्वकाही आहे**, नामापेक्षा या जगात दुसरी कोणतीही मौल्यवान वस्तू नाही.'' गुरू अमरदेवजी प्रसन्न झाले व त्यांनी रामदासजींना नामदान दिले.

रामदासजी सत्याच्या व पवित्रतेच्या मार्गावर चालणारे सत्यनिष्ठ होते. त्यांच्यावर नामाचा खूप चांगला प्रभाव पडला. त्यांनी अत्यंत काटेकोरपणे सेवा केली. रामदासजींनी गुरू अमरदेवजींना आपले सासरे न समजता ते सकल सृष्टीचे सर्वेसर्वा आहेत असे समजले. गुरू अमरदेवजींनी त्यांना जे

काही सांगितले, ते त्यांनी केले. त्याकाळी पाण्याची खूप टंचाई होती. पाणी मिळणे अवघड होते. ज्यावेळी गुरू अमरदेवजी एक विहीर खणत होते, त्यावेळी रामदासजींनी खूप मेहनतीची सेवा केली. त्यांची पत्नी बीबी भानीने देखील दगड–मातीच्या टोकल्या उचलून खूप श्रमाची सेवा केली.

रामदासजी लंगर–प्रमुख होते. ते लंगरमध्ये खूप सेवा करीत असत. गुरू अमरदेवजींनी प्रसन्न होऊन रामदासजींना संगतचे मार्गदर्शन करण्याचे सौभाग्य देखील बहाल केले. रामदासजी शांततेचे प्रतीक होते.

गुरू नानकदेवजींचे सुपुत्र श्रीचंद सदैव रामदासजींचा विरोध करीत असत. एकदा श्रीचंद रामदासजींकडे येऊन म्हणाले,''पूर्वजा, इतकी लांब दाढी का वाढवलेली आहेस?'' रामदासजी नम्रतेचे प्रतीक होते, ते आपल्या दाढीने श्रीचंदांचे चरण झाडत म्हणू लागले,''ही दाढी आपल्यासारख्या महापुरूषांचे चरण झाडण्यासाठीच वाढवलेली आहे.'' गुरू नानकदेवजींचे सुपुत्र श्रीचंदांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ते म्हणाले,''आमच्या अंतरात इतकी नम्रता नव्हती. या नम्रतेमुळेच तुम्ही आमच्या घरातील गुरूपरंपरेची ही वस्तू प्राप्त केली आहे.''

अनेक योगी–पुरुष, सन्यासी तसेच उदासी मतातील त्यागींनी रामदासजीं कडून नामदान प्राप्त करून आपले जीवन सार्थक केले. सर्व देशांमधील सामाजिक धर्मगुरू यागोष्टीशी सहमत आहेत की **नामच सर्वकाही आहे**, मुक्ती नामापासूनच प्राप्त होते, परंतु आम्हांस हे माहीत नाही की नाम काही शब्द आहेत की नाम एखादी शक्ती आहे? प्राचीन देश आणि समाजातील लोक आप–आपल्या बोलीत परमात्म्याचे गुण गात आले आहेत आणि नामाचे गुपित सांगत आले आहेत.

महात्मा दोन प्रकारच्या नामांचा उल्लेख करतात की एक वर्णात्मक नाम आहे व दुसरे धुनात्मक नाम आहे. जे नाम लिहिण्या–वाचण्यात येते ते वर्णात्मक नाम असून जे लिहिण्या–वाचण्यात येत नाही ते धुनात्मक नाम

आहे. महात्मा अपणांस प्रेमाने समजावतात की वर्णात्मक नाम एक माध्यम असून धुनात्मक नाम खरे ध्येय आहे. अनेक महात्मांनी वर्णात्मक नामाचे वर्णन केले आहे आणि अनेक महात्मा भविष्यात येणार आहेत. ते देखील आप–आपल्या बोलीत वर्णात्मक नामाचे वर्णन करतील परंतु धुनात्मक नाम केवळ जीवित महापुरूषच देऊ शकतात.

त्या नामास कोणा महात्म्यांनी वर्ड वा लोगास म्हणून संबोधले, कोणी गुरूबाणी म्हणून संबोधले, कोणी हरिकिर्तन म्हणून संबोधले. मुसलमान त्या पवित्र नामास कलाम, कलामें इलाही किंवा कलमा म्हणून संबोधतात. वेदांमध्ये त्यास राम–नाम, राम–धुन तसेच दिव्यधुनी वा आकाशवाणी असे संबोधलेले आहे की ती वाणी आकाशातून निनादत आहे. कोणा महात्म्यांनी त्यास रब्बे–राग असे देखील संबोधलेले आहे.

साहजिकच मनात प्रश्न उद्‌भवतो की कोणताही एखादा शब्द संसाराची रचना कसे बरे करू शकतो? खंड–ब्रह्मांडाची रचना कशी करू शकतो? एखादा शब्द संसारास व खंड–ब्रह्मांडास कार्यरत कसे ठेवू शकतो? कारण एखाद्या शब्दात इतकी शक्ती कुठे असते? खरेतर ती शक्ती नाम असते. नाम कोणत्याही भाषेत बोलले अथवा लिहीले जाऊ शकत नाही. गुरू अंगददेवजी महाराज सांगतात:

अक्खां बाजो बोलना बिन कन्ना सुनना। पैरां बाजो चलना बिन हत्थां करना।।
जीभां बाजों बोलना एयों जीवत मरना। नानक हुक्म पछाण के त्यों खसमें मिलना।।

ज्या नामाने संसाराची रचना निर्माण केलेली आहे त्यास आपण या बाह्य नेत्रांनी पाहू शकत नाही व या जिव्हेने त्याचे वर्णन करू शकत नाही.

नाम अलिखीत कायदा तसेच न बोलली जाणारी भाषा आहे. बुद्धीमत्तेच्या किंवा तर्कवितर्काच्या कलेने आपण त्यास समजू शकत नाही. बुद्धीमत्ता आपणांस तेथे नेऊन पोहचवू शकत नाही. अनेकदा आपण आपल्या बुद्धीने सांसारिक समस्यांवर तोडगा काढू शकत नाही.

अनेकदा आपणांस वाटते की आपल्याला समजत नाही की या समस्येचे निरसन आपण कसे करू शकतो? बालपणात बुद्धी निराळी असते, तारुण्यात ती निराळीच होते व वार्धक्यावस्थेत येऊन बुद्धी काही वेगळीच होते. ज्या तराजूमधील एखाद्या वस्तूचे वजन कमी–जास्त होतच राहिल्यास त्या वस्तूचे वजन कसे तोलले जाऊ शकते? ते वजन अचूक कसे बरे होऊ शकेल?

महाराज कृपाल सांगत असत,''मन–बुद्धी दोन्ही अज्ञानी आहेत. जेथे मन–बुद्धीची सीमा संपते, तेथूनच अध्यात्मिक मार्गाची सुरुवात होते. जोपर्यंत आपणांस आंतरिक अनुभव होत नाही, तोपर्यंत जे महात्मा आंतरिक अनुभव प्राप्त करून उच्च पातळीवर पोहचलेले आहेत त्यांच्या लेखण्यांवर विश्वास ठेवून आपण फायदा करून घेऊ शकतो.''

आपण महात्मांनी सागितल्यानुसार प्रेम, श्रद्धा आणि मनोभावे ध्यान–अभ्यास करतो तेव्हा रोज–रोज नियमित ध्यान–अभ्यास केल्याने आपणांस त्यात नैपुण्य प्राप्त होते व आपणांस आंतरिक अनुभवाचा साक्षात्कार होतो. त्यानंतर वादानुवाद किंवा तर्कवितर्काच्या जागी प्रेम उत्पन्न होते, आपल्या गुरूंवर खऱ्या अर्थाने श्रद्धा–विश्वास निर्माण होतो. पल्टू साहेब सांगतात:

नाम नाम सब कहत है नाम न पाया कोय।
नाम न पाया कोए नाम की गत है न्यारी।
जे कोई चाहे नाम ते नाम अनाम है।
पढ़न लिखन में नाही नेह अक्षर काम है।
रूप कहो अनुरूप पवन अनिरेख ते।
हां रे पल्टू गैर दृष्टि ते सन्त नाम वो देखते।।

जेव्हा आंतरिक नेत्र उघडतात, ते नेत्र नामास पाहतात, अंतर्यात आत्मा नामरस प्राशन करतो. नामाची दौलत साधू–संत–महात्मांकडून प्राप्त होते. आपले मन हे आपले जन्मजात शत्रू असून ते आपल्या अंतरातच बसलेले आहे. ते आपणांस नामाच्या दौलतीकडे जाऊ देत नाही, विचित्र अभ्यासांमध्ये गुरफट वून ठेवते. आपण कधी जप–तप करतो, कधी पूजा–

पाठ करतो आणि कधी तिर्थस्थळी जाऊन त्यांत स्नान केल्याने तसेच दान–धर्म केल्याने मुक्ती मिळते असे समजू लागतो. काही उत्साही लोकं यज्ञ करण्यात वा ग्रंथ–पोथ्यांचे पठण करण्यानेच मुक्ती मिळते असे समजतात. उच्च शिक्षित लोक विद्येच्या चक्रव्युहातच फिरत रहातात आणि खरा मुद्दा विसरून जातात.

गुरू रामदासजींनी आपल्या गुरूंकडे नामाची श्रेष्ठ दौलत मागितली, त्यांनी कोणतीही सांसारिक गोष्ट मागितली नाही. नाम प्राप्त करण्याआधी या गोष्टीचा नीट विचार करावा की आपणांस नामाचा जप करून सांसारिक मान–मोठेपणा वा धन–संपत्ती प्राप्त करावयाची नाही तसेच इतर लोकांना रिद्धी–सिद्धी दाखवायची नाही. सर्वसाधारणपणे नामाच्या अभ्यासू व्यक्तीस रिद्धी–सिद्धी प्राप्त होतात. रिद्धी–सिद्धी अभ्यासू व्यक्तीसमोर हात जोडून उभ्या रहातात की आमचा स्वीकार करा. काळ–शक्तीने सत्संगी व्यक्तीस अध्यात्मिक मार्गात अडकवून ठेवण्यासाठीच रिद्धी–सिद्धी निर्माण केल्या.

महाराज सावन सिंहजी सदैव आपल्या नामधारी सेवकांना सावध करीत सांगत असत,''आपण निसर्गाच्या नियमांनुसार आपले जीवन जगा. जर आपल्या गुरूंनी आपल्यावर दया केली तर आपण कोणताही चमत्कार करून दाखवू नका. इतर लोकांना चमत्कार करून दाखवणे म्हणजे आपली अध्यात्मिक कमाई व्यर्थ घालविण्यासमान आहे.''

नाम मिलै मन त्रिपतीए बिन नामैं धृग जीवास।

गुरू रामदासजी महाराज सांगतात की,''तृप्ती नामात आहे. शांती नामात आहे आणि **नामातच सर्वकाही आहे**. लोकांनी नामाच्या दिशेने पाठ केलेली आहे. मनुष्यजन्म मिळून ज्यांना नाम मिळाले नाही वा ज्यांच्या हृदयात नाम प्राप्त करण्याची इच्छाच उत्पन्न झाली नाही, त्यांचे या जगात येणे निरर्थक व निष्फळ आहे. त्यांचे जीवन धृग (व्यर्थ) आहे.''

कोई गुरमुख सज्जण जे मिलै मैं दस्से प्रभ गुणतास।।

आपण प्रेमाने समजावता की, नाम साधूंची मालमत्ता आहे. नामाने साधूंच्या अंतरात निवास केलेला आहे. मला एखादा असा गुरूमुख सज्जन मिळावा ज्याने नाम–साधना करून नामरूप बनून अध्यात्मिक शिखर गाठले असावे. त्याने माझ्यावर दया करून मला नामाचे दान देऊन आंतरिक मार्ग दर्शवावा व त्यामार्गावर माझी मदत करावी.''

जिनि ऐसा हर नाम न चेतया से काहे जग आए।
ऐह मानस जन्म दुर्लभ है नाम बिन बिरथा सब जाए।
हुण वथ हर नाम न बीजया अग्गे भुखा क्या खाए।
मनमुखां नू फिर जन्म है नानक हर भाए।।

जिन्हां मस्तक धुरो हर लिखया तिन्हां सतगुरू मिलया।
अज्ञान अंधेरा कटया गुरू ज्ञान घट बलया।
हर लद्दा रतन पदार्थ फिर बोहड़ न चलया।
नानक नाम अराधया अराध हर मिलया।।

हौं तिस विट्टों चौखंनीए मैं नाम करे परगास।।

आपण सांगता,''मी आपल्या शरीराचे चार तुकडे करून गुरूंवर स्वत:चे बलिदान देतो. त्यांनी माझ्या अंतरातील अज्ञानतेचा अंध:कार दूर करून नामाचा प्रकाश पसरविला व नामाची ज्योत प्रज्वलीत केली.''

मेरे प्रितमां हौं जीवां नाम ध्याय।।

मी अगोदरही सांगितले की जेव्हा आपण आपल्या संसारात विखुरलेल्या विचारांना तिसऱ्या तिळावर एकाग्र करतो आणि जेव्हा अंतर्यातील मार्ग उघडून आपण आंतरिक अनुभव प्राप्त करतो तेव्हा आपल्या अंतरात प्रेम उफळून येऊ लागते, त्यानंतर आपण गुरू–स्वरूपास एक सेकंद देखील आपल्या नजरेआड होऊ देत नाही. आपण हजारो प्रकारची निमित्त सांगतो की आपले लक्ष एकाग्र होत नाही, कोण म्हणतो माझे गुढगे व घोटे दुखतात, कोण म्हणतो मला झोप येते.

अमली जिए अमल खाए ते हर जन जिए नाम ध्याए।

ज्याप्रमाणे व्यसनी लोकं व्यसनाच्या आधारेच आपले जीवन व्यतीत करतात, जर त्यांनी अमली पदार्थ खाल्ला तर त्यांच्या शरीरात यातना होऊ लागतात. त्याचप्रमाणे ध्यान–अभ्यासू व्यक्तीची स्थिती देखील अशीच होते. ज्यांनी नामास आपला जीवन आधार बनविले त्यांची कोणतीच तक्रार नसते. असे व्यक्ती जेव्हाही माझ्याकडे येतात तेव्हा ते आपल्या आंतरिक अनुभवांविषयी अथवा आंतरिक प्राप्तीविषयीच बोलतात.

बिन नावैं जीवण ना थीऐ मेरे सतगुर नाम दृढ़ाए।।
नाम अमोलक रतन है पूरे सतगुर पास।।
सतगुर सेवै लग्गयां कढ रतन देवै परगास।।

गुरू रामदासजी सांगतात,''नाम एक अनमोल रत्न आहे. दुनियेतील रत्ने पाषाणरूपी आहेत. रत्न मौल्यवान दगडांचे खडे असतात. परंतु नाम हिरे–रत्नांपेक्षाही खूप उच्च व मौल्यवान आहे, **नामच सर्वकाही आहे**. नाम गुरूंकडे असते. जे गुरूंच्या सेवेत मग्न होतात, गुरूंच्या शिकवणीनुसार आपले जीवन व्यतीत करतात, गुरू त्यांच्या सेवेवर प्रसन्न होऊन त्यांच्यापुढे नामरूपी रत्न ठेवतात.''

जी मुले आपल्या शिक्षकाने सांगितलेले ऐकतात व मेहनतीने अभ्यास करतात त्या मुलांकडे शिक्षकही विषेश लक्ष देतात. असे मुल आपल्या वर्गात प्रथम क्रमांक प्राप्त करून उत्तीर्ण होते. त्याचप्रमाणे जे शिष्य संतांच्या शिकवणीनुसार आपले जीवन पवित्र ठेवतात नामाची कमाई करतात, संत त्या शिष्यांवर जास्त लक्ष देतात. संत प्रयत्न करतात की माझी मुले माझ्या जीवनकाळातच स्वत:च्या पायावर उभी रहावीत.

धंन वडभागी वगभागीआं जो आय मिले गुर पास।।

केवळ थोर भाग्यवंत जीवच मनुष्यजन्मात गुरूचरणी बसून नाम प्राप्त करतात आणि नामाची कमाई करतात।

जिनां सतगुर पुरख न भेटयो से भागहीण वस काल।।

आपण सांगता,''ज्यांना मनुष्यजन्म मिळाल्यानंतरही परिपूर्ण गुरूंकडून नाम प्राप्त होत नाही, परिपूर्ण गुरूंच्या शरणी जाण्याचे सौभाग्य प्राप्त होत नाही, त्यांना काळ बहकावितो व ते काळाच्या भ्रमजाळ्यात अडकतात.

ओय फिर फिर जोन भवाईऐं विच विसटा कर विकराल।।

ज्यांना नाम मिळत नाही त्यांचे या दु:खांच्या दुनियेतील आवजाव कधी संपतच नाही. त्यांचा कधी एकीकडे जन्म होतो तर कधी दुसरीकडे जन्म होतो. काळ त्यांना अशी सजा देतो की त्यांना विष्टेवरील किडा देखील बनवितो. कबीर साहेब सांगतात:

यम का ठेंगा बुरा है ओह नहीं सहा जाए। एक जो साधु मोहे मिलया तिन्हू लिया बचाए।।

प्रभू–परमेश्वराने दया करून मला मनुष्यजन्म बहाल केला, त्यास प्राप्त करण्याची संधी दिलेली आहे, परंतु आपण त्या संधीस विषय विकारांमध्ये व्यर्थ गमावून नर्कांचे किडे बनण्यास तयार होतो.

ओनां पास दुआस न भिटीए जिन अंतर क्रोध चंडाल।।
सतगुर पुरख अमृतसर वडभागी नावेंह् आय।।

आपण सांगता,''कामी–क्रोधी मनुष्य परमात्म्याच्या भक्तीमार्गावर येऊ शकत नाहीत, त्यांच्या सोबतीत बसण्याचा काही फायदा नसतो. आपल्यावर देखील त्यांच्या वृत्तीचा परिणाम होतो. त्यांच्या सोबतीत केवळ एकदा जाऊन आपणांस याबद्दल कळत नाही, परंतु पुन्हा त्यांच्या सोबतीत जाऊ नये. सतगुरू व त्यांचा सत्संग अमृताचे सरोवर आहे. भाग्यशाली जीवच त्या अमृताच्या सरोवरात स्नान करून निर्मळ बनतात व नामाची कमाई करतात.''

उन जनम जनम की मैल उतरै निरमल नाम दृढ़ाय।।
जन नानक उत्तम पद पाया सतगुर की लिव लाय।।

आपण सांगता,''ते अत्यंत भाग्यशाली जीव आहेत जे महात्मांकडे जातात, त्यांच्या सत्संग सरोवरात स्नान करतात. त्यांची जन्म-जन्मांतरीची पापं नष्ट होतात, ते निर्मळ होतात, नामाची कमाई करण्यास सक्षम बनतात. ते गुरूंशी समरस होऊन सचखंडात जातात. त्यांना उत्तम पदाचे बक्षिस अर्थात सचखंडात स्थान मिळते.''

परमात्मा एक समुद्र आहे, सतगुरू त्याची लाट आहेत आणि आत्मा त्याचा थेंब आहे, त्यांमध्ये फरक केवळ एकमेकांपासून विरह झाल्याचाच असतो. जेव्हा समुद्रातील पाण्याचा थेंब लाटेत मिळतो तेव्हा लाट त्यास समुद्रातच नेऊन बसविते.

गुरू रामदासजींनी आपणांस या छोट्याशा वाणीत नामाविषयी खूप काही समजावले आहे की तृप्ती आणि शांती नामातच आहे, नामच सुखांचा अमृतरस आहे. आजपर्यंत कोणालाही धन-संपत्ती वा विषय-भोगांमधून सुख प्राप्त झालेले नाही व मिळूही शकणार नाही. आपण प्रेमाने समजावता की नामच जीवनाचे अन्न-पाणी आहे, जे आत्म्याची तहान भागवते. ते जीव खूप भाग्यशाली आहेत जे नाम प्राप्त करतात. आपले देखील कर्तव्य आहे की आपण शब्द-नामाची कमाई करावी व आपले जीवन पवित्र करावे.

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी एस, राजस्थान

एक प्रेमी : *प्रिय महाराजजी! मनुष्य शरीराच्या चारही बाजूस कधी–कधी निरनिराळ्या रंगांच्या छटा आणि निरनिराळ्या आकारांची ज्योत दृष्टीस पडते. याचा परमार्थाशी काही संबंध आहे का?*

बाबाजी : आपणांस पूर्ण संतांखेरीज सामान्य मनुष्याच्या भोवती कधीही ज्योत दिसत नाही. पूर्ण संतांच्या भोवतीदेखील आपणांस ज्योत तेव्हाच दिसते, जेव्हा आपण सत्संगासाठी बसलो असता आपले लक्ष पूर्णपणे एकाग्र झालेले असते. गुरू नानकदेवजी सांगतात :

जाँकी होय भावना जैसी, हरि मूरत देखी तिन तैसी।

आपण जेव्हा इतर सर्व गोष्टींवरून आपले लक्ष दूर सारत, आपल्या विचारांना पवित्र राखत सत्संगासाठी बसतो, तेव्हा कधी–कधी त्या ज्योतीमधून प्रकाश–किरणे बाहेर पडताना दिसतात आणि अनेकदा पूर्ण ज्योत देखील नजरेस पडते. अनेकदा आम्हांस असा अनुभव आपले सतगुरू महाराज कृपालजींच्या वेळी होत असे.

एक प्रेमी : *महाराजजी! आम्ही जेव्हा तुमच्या आश्रमात येतो व तुमच्या प्रेमाच्या रेडियेशनमध्ये जोडले जातो, तेव्हा आमचे ते दिवस अत्यंत आनंदात व्यतीत होतात. ते प्रेमाचे रेडियेशन जेव्हा खंडित होते, तेव्हा ते पुन्हा जोडले जाण्याचा उपाय काय आहे? ते रेडियेशन खंडित का होते?*

बाबाजी : संगतची रंगत चढणे हे स्वाभाविकच आहे. त्यासाठीच संत चांगली संगत करण्याचा आग्रह करतात. तुम्ही येथे आल्यानंतर जसे माझ्या सान्निध्यात असता, तसेच तुम्ही तुमच्या देशात परतल्यानंतरही मी तुमच्या सान्निध्यात असतो जसा इथे आहे, परंतु तुमच्या मायदेशी परतल्यानंतर

तुम्ही आपापल्या घरातील कामांत कार्यमग्न होता व जगरहाटीमध्ये गुंतून जाता. तुम्हांस माझी आठवण फार कमी येते. कबीर साहेब सांगतात:

गुरु सबको चाहे गुरु को चाहे न कोय।

पूर्वीच्या काळी हुकुमशहा जहाँगीरने लाहोर येथे त्याचा मंत्री चंदू सवाईला आदेश दिला की, गुरू अर्जुनदेवजींना खूप कठोर शिक्षा दिली जावी. गुरू अर्जुनदेवजींना तऱ्हेतऱ्हेच्या शारीरिक वेदना दिल्या गेल्या. त्यांना तप्त तव्यावर बसवून त्यांच्या डोक्यावर गरम वाळूचा वर्षाव केला गेला, उकळत्या पाण्यामध्ये त्यांना बसविले गेले. हे सर्वकाही धर्माच्या नावाआड केले गेले, कारण कट्टर सामाजिक लोकांच्या हृदयात इतर समाजांच्या लोकांप्रती तिरस्कार असतो.

संत या जगामध्ये येताना सोबत प्रेमच घेऊन येतात. त्यावेळी गुरू अर्जुनदेवजींच्या शिष्यांवर जो काही प्रसंग ओढवला होता, तो केवळ तेच जाणत होते. त्यांच्या अंत:करणात विचार येई की कुणास ठाऊक! आपल्या सतगुरुंशी कशी वागणूक केली जात असेल? आश्रमांमध्ये तसेच सतगुरुंच्या आजुबाजूस राहणारे असे अनेक शिष्य असतात जे सतगुरुंचे दर्शन झाल्याशिवाय अन्नही ग्रहण करीत नाहीत. अशा प्रसंगी त्या शिष्यांची अवस्था अतिशय बिकट होते.

अमृतसर आणि लाहोर या दोन शहरांमध्ये तीस मैलांचे अंतर होते. प्रेमी शिष्य शाम गुरू अर्जुनदेवजींच्या घराच्या भोवती शब्द–किर्तन म्हणत आणि प्रदक्षिणा घालत असत. त्या शिष्यांची अशी धारणा होती की, जर आपण तसे केले तरच गुरूसाहेब त्यांना दर्शन देतील. आज पाचशे वर्षांनंतरही तिच धारणा प्रेमी शिष्यांची आहे. कारण एकदा का एखादा रिति–रिवाज सुरू झाला की तो अखंडीतपणे पुढे चालू राहतो.

पूर्वी गुरू नानकदेवजी, कबीर साहेबजींसारखे जे गुरू होऊन गेले, त्यांना आपण आपल्या सतगुरुंपेक्षा निराळे मानत नाही. आपण मानतो की, ती शक्ती केवळ शरीर बदलून पुन्हा या जगात आलेली आहे. महाराज

सावन सिंहजींची नामधारी एक वृद्धा, एके दिवशी त्याच शब्द–चौकीमध्ये गेली. ती म्हणाली की, आपण गुरू अर्जुनदेवजींच्या स्वरूपामध्ये असताना येथे प्रेमींना दर्शन देत असत. आज मी तुमचे दर्शन घेण्यासाठी आलेली असून तुम्ही मला दर्शन द्यावे.

महाराज सावन सिंहजींनी त्या वृद्ध मातेस दर्शन दिले, सोबत प्रसादही दिला. त्यावेळी त्या वृद्ध मातेच्या अंत:करणात विचार आला की, आपण घरी जाऊन आपल्या मुलांनाही येथे आणावे की, महाराजजी अमृतसरला आले आहेत, तेव्हा मुलांनीही येथे येऊन महाराजजींकडून प्रसाद घ्यावा. परंतु जेव्हा मुलांना होऊन ती वृद्ध माता परत आली, तेव्हा तेथे महाराजजी नव्हते. ती महाराजींच्या ब्यास येथील आश्रमात गेली. तेथे महाराजजी सत्संग करत होते. ती वृद्ध माता महाराज सावन सिंहजींना म्हणाली,''तुम्ही फसवे आहात, तुम्ही मला फसविले आहे. तुम्ही मला दर्शन दिलेत. परंतु दर्शनासाठी मी माझ्या मुलांना आणले असता तुम्ही तेथे नव्हतात.''

संत मान–सन्मानाचे भुकलेले नसतात. महाराजजी म्हणाले, ''सत्संगात बसलेले सर्वजण साक्षीदार आहेत की, बऱ्याच वेळापासून मी येथे सत्संग करीत आहे. मी अमृतसरला गेलोच नाही. त्यामुळे तुझा काहीतरी गैरसमज झाला आहे. मी तुझी कोणत्याही प्रकारे फसवणूक केलेली नाही.'' ती वृद्ध माता म्हणाली, ''मला कुणाच्या साक्षीची काय गरज? मी तुम्हाला साक्षात पाहिले होते. माझ्याकडे तुम्ही दिलेला प्रसादही आहे.'' महाराजजी हसून म्हणाले, ''जोपर्यंत माझ्याबद्दल तू विचार करीत होतीस, मी तुझ्या जवळ होतो. तू जेव्हा तुझ्या मुलांमध्ये गेलीस, मी माझ्या संगतमध्ये आलो.'' संत–सतगुरु तर आपल्या जवळच वावरत असतात. आपण आपल्या जगामध्ये व्यस्त होऊन जातो.

सतगुरुंच्या महिमेचे वर्णन केले जाऊ शकत नाही. त्यांच्या दयेचे वर्णन ग्रंथांमध्ये सामावू शकत नाही. ही प्रेमी आणि सतगुरु यांची आपापसातील बाब असते. रात्रीचा वेळ असेल, घराबाहेर वादळी पाऊस पडत असेल, घर

चोहो बाजूंनी बंद असेल आणि घराबाहेर पडणेही अशक्य असेल, तर अशा परिस्थितीत जर तुमच्या अंतरात सतगुरुंची निर्मळ आठवण, त्यांच्या भेटीची खरी तळमळ असल्यास सतगुरु नक्कीच तुमच्या समोर असतील. ते तुमचे सर्व सांगणे ऐकतील. स्वत: तुमच्यासमोर ते प्रगट होतील.

एक प्रेमी : *मी सत्संगामध्ये ऐकले आहे की, काळाकडे असा अधिकार आहे की तो सतगुरुंचा हात, डोळा किंवा त्यांच्या शरीराचा कोणताही अवयव मागू शकतो. असे सेवकांच्या चुकीमुळे वा वाईट कर्मांमुळेच होते का?*

बाबाजी : महाराज सावन सिंहजी सांगत असत की, काळ कोणत्याही सत्संगीचे तिळाएवढेही कर्म माफ करीत नाही. काळ त्या कर्माची पुरेपूर परतफेड करून घेतो, मग ती परतफेड गुरू करोत वा शिष्य करोत. तुम्हांस सेवकांची अवस्था माहितच आहे की त्यास साधा ताप जरी आला, तरी तो रात्रभर सतगुरुंसमोर विनवण्या करीत राहतो, इतर प्रेमींनाही म्हणतो, ''बंधुंनो! तुम्ही गुरूंसमोर माझ्यासाठी प्रार्थना करावी की माझा ताप दूर होवो.'' ज्या गुरूंसमोर तुम्ही प्रार्थना करता, ते तुमचे कर्म योग्य तितके नक्कीच स्वत:वर घेतात. सतगुरूंची स्वत:ची कोणतीही कर्मं नसतात व ते स्वकर्मांमुळे होणाऱ्या आजारापणापासून मुक्त असतात, कारण ते स्वत:च्या कर्मांची परतफेड करण्यासाठी आलेले नसतात. ते तर इतरांची मुक्त करण्यासाठी आलेले असतात. काळास अधिकार असतो की त्या प्रेमीच्या आजाराच्या वा कर्माच्या बदल्यात सतगुरुंकडे त्याच्या मर्जीनुसार तो कसलीही मागणी करू शकतो.

तुम्हाला कल्पना आहे की, जेव्हा एखादा कर्जदार मनुष्य सावकाराच्या कर्जाची परतफेड करू शकत नाही, तेव्हा सावकार आपल्या मर्जीनुसार कर्जदाराचे घर, जनावरे वा घरातील कोणत्याही वस्तुची मागणी करू शकतो. अशावेळी कर्जदार मनुष्य सावकारासमोर काय बोलणार? याचप्रकारे काळाची मर्जी असते की शिष्याच्या कर्मांच्या बदल्यात सतगुरूंकडून काय मागावे? सतगुरू आपल्या शिष्यांच्या कर्मांची परतफेड आनंदाने करतात.

प्रिय मुलांनो! हजारो माणसे भेटतात आणि पत्रांद्वारे लिहून कळवितात की, माझे, माझ्या मुलांचे, माझ्या नातवंडांचे आणि पणतुंचे दुखणे देखील दूर करा, मग भलेही त्यांनी नाम घेतलेले नसो तसेच सत्संगास येण्यास ते राजी नसोत. आपण आपले एवढे सर्व कर्मांचे ओझे सतगुरुंवर लादतो आणि वर म्हणतो की ध्यान-अभ्यास तर मी करीत नाही तेव्हा तुम्हीच दया करा.

आपण आपले सर्व कर्मांचे ओझे त्यांच्यावर लादूनही ते शांतपणे सहन करतात, कारण ते शांतीचे द्योतक असतात. तुम्ही काळाच्या राज्यात आलेले आहात जेथे कर्मांच्या परतफेडीचा कायदा अतिशय कडक आहे. जो करतो तो भरतो, प्रत्येक कर्माचा पुरेपूर मोबदला द्यावा लागतो, त्या कर्माचे फळ नक्कीच भोगावे लागते. काळाच्या राज्यामध्ये न्याय आहे, माफी नाही. दयालच्या (सत्पुरूषाच्या) राज्यात माफी असते.

एका प्रेमीने महाराज सावन सिंहजींकडे येऊन म्हटले की, तुमच्या जन्मपत्रिकेत तुमचे आयुष्य शंभर वर्षांचे लिहिलेले आहे. महाराजजी म्हणाले, ''होय! मला जर टिकून माझे कार्य करू द्याल, पत्रांद्वारे माझ्यावर कर्मांचे ओझे तुम्ही लादले नाहीत, दु:ख-वेदनांनी भरलेली पत्रे मला लिहिली नाहीत, केवळ पारमार्थिक विषयांवरच पत्रे लिहिलीत आणि माझ्या करवी तुमच्या दुष्कर्मांची परतफेड करविली नाहीत तर कदाचित मी शंभर वर्षे राहू देखील शकेन.'' परंतु महाराज सावन सिंहजींनी या इहलोकीची यात्रा नव्वदाव्या वर्षीच आटोपली. ध्यान-अभ्यास करणाऱ्यांना कल्पना आहे की, महाराज सावन सिंहजी दहा वर्षे अगोदरच या जगातून निघून गेले. त्याचप्रमाणे परमपिता कृपालजीदेखील चौदा वर्षे अगोदर या जगातून निघून गेले.

आमच्या गंगानगरमध्ये एक रिवाजच पडला होता की, जर कुणी आजारी पडले तर सर्वजण ध्यान-अभ्यासात बसत असत आणि सर्व संगत आजारी व्यक्ती बरी व्हावी म्हणून महाराजजींच्या चरणी प्रार्थना करत असे. हे सर्व मी बरेच दिवस पाहत होतो. एके दिवशी मी म्हणालो, मला या गोष्टीचा खूप

खेद वाटतो कारण आपल्याकडून स्वत:च्या वाट्याचा ध्यान–अभ्यासदेखील होत नाही. सतगुरूंना न सांगताच आपल्या बऱ्याच कर्मांचे ओझे स्वत: उचलावे लागते. जेव्हा आपण इतकी माणसे एकत्र येऊन आजाऱ्यास बरे करण्यासाठी महाराजजींपुढे प्रार्थना करतो तेव्हा त्यांच्यावर आणखीन किती ओझे लादतो? ही अतिशय वाईट गोष्ट आहे. काही लोकांना माझे हे बोलणे कटू वाटले. परंतु जे लोक सतगुरूंवर अंत:करणापासून प्रेम करीत होते, त्यांना माझे बोलणे मधुर वाटले, त्यांना ते पटले.

एकदा महाराज कृपाल माझ्या आश्रमात आले. एक पती–पत्नीचे जोडपे त्यांच्या लहान मुलीसह तेथे आले. त्या पती–पत्नीने मला सांगितले की त्यांना महाराजांना भेटावयाचे आहे. त्यांची कृपादृष्टी या मुलीवर पडावी, कारण ही रात्रभर रडत असते. मी त्यांना म्हणालो, एक तर ही आजारी असेल किंवा उपाशी राहत असेल. तुम्ही तिला शांत करू शकत नाही का? त्यांना माझे बोलणे झोंबले. त्यांना वाटले की मी त्यांची महाराजजींशी गाठ घालू देऊ इच्छित नाही. आपल्या मुलांना गुरूंनी शांत करावे या सारखी क्षुल्लक कर्मदेखील गुरूंनी उचलावीत अशी आपण अपेक्षा ठेवतो.

एकदा महाराज सावन सिंहजी खूप आजारी पडले. एका प्रेमीने त्यांना विचारले,''महाराजजी! हे कर्म तुमचे कर्म आहे की तुमच्या एखाद्या सेवकाचे आहे?'' खरे तर ते कर्म त्याच प्रेमीचे होते, ज्याने हा प्रश्न विचारला. महाराजजी म्हणाले, ''संतांचे स्वत:चे असे कोणतेही कर्म नसते.''

मी सांगत असतो की अनेकदा संत ज्या सेवकाचे कर्म स्वत:वर घेत असतात, तोच प्रेमी स्वत:च्या अंतरात अभाव आणतो की संत असूनही यांची ही अवस्था! परंतु सतगुरू दयाळू पुरुष असतात, क्षमाशील व करुणामय असतात. कोणतीही प्रार्थना न करता देखील शिष्यांची उचित मदत करण्यात त्यांना आनंद वाटतो. ज्याप्रमाणे आई आपल्या मुलास अन्न भरविताना प्रसन्न होते, त्याचप्रमाणे सेवकांच्या मुखामध्ये अन्न पडल्यानंतरच स्वत: अन्न खाऊन सतगुरू प्रसन्न होतात.

एक प्रेमी: *काही दिवसांपूर्वी तुम्ही अशा सेवकांविषयी गोष्ट सांगितली होती जे स्वत:च्या गुरूंना सोडून कोणा दुसऱ्या गुरूंकडे जातात. अशा सेवकांच्या मृत्युसमयी त्यांची काय अवस्था होते?*

बाबाजी: ज्यांना सतगुरू नामदान देतात, त्यांना ते नक्कीच स्वगृही म्हणजे सचखंडास नेतात, हे त्यांचे ब्रीदच असते. तुम्हाला कल्पना आहे की दोन होडींवर पाऊल ठेवणाऱ्यांना त्रास तर होतोच.

एक प्रेमी: *ईसा मसीह हे खरे व परिपूर्ण गुरू आहेत का?*

बाबाजी: आम्ही सर्व संतांचा आदर करतो, सर्वांनी सत्याचा संदेश दिलेला आहे. अंतर्यात जाऊन आजदेखील त्या शक्तीला आपण पाहू शकतो. स्वामीजी महाराज सांगतात,''आपला संबंध विद्यमान (सध्य:कालिन) शक्तींशी आणि विद्यमान (सध्या जगात कार्यरत असलेल्या) गुरूंशी असतो.''

आपला जरी अशा महात्म्यांशी मिलाप झालेला नसेल, त्यांच्याद्वारे आपणांस शब्द-नामाचे दान मिळाले नसेल वा त्यांनी आपली जबाबदारी घेतलेली नसेल, तरीही त्या महात्म्यांनी ज्यांना शब्द-नामाचे दान दिले, ज्या सेवकांनी त्यांच्या आज्ञेचे पालन केले व त्यांच्या शिकवणुकीनुसार आपले जीवन व्यतीत केले, त्या सेवकांना ते महात्मा स्वत:चे स्वरूप बनवून सोबत घेऊन गेले.

आज ज्या महात्म्यांद्वारे आपण शब्द-नामाचे दान घेऊन त्यांच्या आज्ञेचे पालन करतो, ते महात्मे आपणांस सोबत घेऊन सत्यामध्ये विलीन होतील. स्वामीजी महाराज सांगतात:

पिछले की तज टेक तेरे भले की कहूँ। वक्त गुरु को खोज तेरे भले की कहूँ।।

महाराज सावन सिंहजी त्यांच्या सत्संगामध्ये नेहमी एक उदाहरण देत असत की चार विद्यमान गोष्टी आपल्या उपयोगी पडतात. विद्यमान गुरू आपणांस शब्द-नामाचे दान देऊ शकतात. विद्यमान डॉक्टर आपणांस

औषध देऊन आपला उपचार करू शकतो. विद्यमान पती अपत्य जन्मास घालू शकतो आणि विद्यमान शिक्षक आपणांस शिकवू शकतात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''लुकमान हकीम आणि धन्वंतरी वैद्य हे दोघे आयुर्वेदातील तज्ज्ञ होते. नि:संशयपणे ते त्यांच्या आयुर्वेदीक ज्ञानाच्या आधारे मृतास जिवंतही करू शकत होते. परंतु जर का आज आपण आजारी पडलो आणि आपल्यावर लुकमान हकीम वा धन्वंतरी वैद्य यांनी उपचार करावा असा आपण हट्ट केल्यास त्याचा काहीच उपयोग नाही, कारण काही केल्यास आज ते येऊ शकणार नाही. त्यासाठी आपणांस विद्यमान डॉक्टरकडे जाऊन स्वत:चा उपचार करून घ्यावा लागेल.''

याचप्रमाणे येथे राजस्थानमध्ये गंगासिंह नावाचा राजा होऊन गेला. त्याचा मृत्यु चाळीस वर्षांपूर्वी झाला. त्याने स्वत:च्या टेबलावर तराजू ठेवला होता. तो म्हणत असे, ''मी मोजून–मापून न्यायदान करतो. त्याने असेही घोषित केले होते की भ्रष्टाचाऱ्यास एखादेवेळी परमेश्वर माफ करेल परंतु माझी न्याय–लेखणी त्याला माफ करणार नाही.'' हे सत्य आहे की त्याच्या मुलाच्या हातून गुन्हा घडल्यावर त्याने स्वत:च्या मुलासही माफ केले नाही. आज आपण जर म्हटले की गंगा सिंह राजा अतिशय न्यायनिष्ठुर होता म्हणून आपण आपल्या केसचा निकाल त्याच्या करवीच करून घ्यावा तर ते शक्य नाही, कारण ना तो आपल्या केसची फाईल पाहू शकतो, ना तो आपल्या केसचा न्यायनिवाडा करू शकतो. त्यासाठी आपणांस विद्यमान न्यायधिशाकडेच जावे लागेल.

याचप्रमाणे राजा विक्रमादित्य अतिशय धर्मात्मा होता. जर आज एखादी मुलगी म्हणू लागली की मला धर्मात्मा विक्रमादित्यापासूनच अपत्यप्राप्ती व्हावी, तर ते शक्य नाही. त्यासाठी त्या मुलीस विद्यमान पतीची गरज आहे.

याचप्रमाणे एखाद्या शिक्षकास हे जग सोडून हजारो वर्षे उलटली असतील, आपण म्हटले की त्या शिक्षकानेच येऊन आपल्या मुलास शिकवावे, तर ते

शक्य नाही, तो आता येऊन आपल्या मुलास विद्या देऊ शकत नाही. त्यासाठी आपणांस आज अस्तित्वात असलेल्या शिक्षकाचीच गरज पडेल. आम्ही सर्वांचा आदर करतो. परंतु आपला संबंध विद्यमान गुरूंशीच आहे, ज्यांनी आपणांस शब्दनामाचे दान देऊन आपली जबाबदारी घेतलेली आहे.

महाराज सावन सिंहजी सत्संगामध्ये त्यांच्या जीवनातील एक घटना सांगत असत. ते जेव्हा बाबा जयमल सिंहजींच्या सत्संगासाठी जात असत, तेव्हा त्यांना ब्यास स्टेशनवर नेहमी एक पादरी भेटत असे, जो त्यांना विचारी, ''ईसा मसीह मोठे, कबीर साहेब मोठे की बाबा जयमल सिंह मोठे आहेत?'' महाराज सावन त्यास म्हणाले, ''तू ईसा मसीह आणि कबीर साहेबांना आणून माझ्यासमोर उभे कर मग मी सांगतो.'' तो पादरी म्हणाला, ''हे तर मी करू शकत नाही.'' महाराज सावन सिंहजी म्हणाले, ''मी तर बाबा जयमल सिंहजींना पाहिले आहे. मी त्यांनाच मोठे म्हणू शकतो.''

मी एकदा माझ्या आजोबांच्या घरी गेलो. साधरणत: तेथे माझे मामा माझ्याशी खूप पारमार्थिक वाद-विवाद करीत असत. त्यांनी मला विचारले की,''तू परमेश्वरास पाहिले आहे का?'' मी म्हणालो, ''होय! मी सहा फुटी उंच, चालता-बोलता परमेश्वर पाहिला आहे, त्याने माझी जबाबदारी स्वीकारलेली आहे.'' ते जेव्हा मला वेडा म्हणत, तेव्ही मी म्हणे:

कृपाल सिंह नू सिमर के पापी तरे अनेक।
कहे अजायब न छड्डिए कृपाल सिंह की टेक।।

एक प्रेमी: *महाराजजी! एखाद्या प्रेमीने नाम घेतल्यानंतर काही काळाने त्यास अनेक अडीअडचणींना तोंड द्यावे लागते, असे का होते?*

बाबाजी: मुसलमानांचा पवित्र ग्रंथ, कुराणामध्येही हाच प्रश्न नमुद केलेला आहे. मोहम्मद साहेबांना विचारले गेले की जेव्हा एखादा जीव परमार्थाच्या मार्गावर वाटचाल करू लागतो, तेव्हा त्यास खूप अडीअडचणी येतात. परंतु जेव्हा कोणी पाप-कुकर्मे करतो, तेव्हा त्यास तेवढ्या अडचणी येत नाहीत.

सत्य हे आहे की आपले मनच आपल्या अंतरामध्ये असे चुकीचे विचार निर्माण करीत असते.भक्ती–मार्गापासून आपणांस दूर सारणे हेच मनाचे काम आहे. मोहम्मद साहेबांनी त्यांच्या सेवकांना अतिशय प्रेमाने उत्तर दिले की जेव्हा जीव नाम घेतो, तेव्हा सतगुरूंचा पुरेपुर प्रयत्न असतो की या जीवास या जगामध्ये पुन:र्जन्म घ्यावा लागू नये. त्यामुळे त्या जीवाच्या गतजन्माच्या काही कर्मांची परतफेड सतगुरू याच जन्मामध्ये करवून घेतात, तर काही कर्मे स्वत:वर घेतात. त्या जीवाच्या जन्मोजन्मींच्या पाप–कर्मांची परतफेड याच जन्मात करवून घ्यायची असल्याने त्या जीवास काही प्रमाणात अडीअडचणींना सामोरे जावेच लागते. म्हणूनच भक्त दु:खी आहे असे इतरांस दिसून येते.

मनमुख तर भक्तीमार्गाकडे वळतच नाही. मनुष्यास त्याच्या प्रत्येक चुकीची किंमत द्यावीच लागते. परमात्म्याची इच्छा असते की अशा जीवास मनुष्याचा पुनर्जन्म न देता चौऱ्यांशी लक्ष योनींमध्ये त्यास परत धाडावे. जी पुण्यकर्मे त्याने केलेली असतात, ती त्याच्या समोर आणून त्यांचा उपभोग याजन्मातच करविला जातो. ज्यांनी पापं केलेली असतात त्यांची पुण्यकर्मं समोर आणून त्या पुण्यकर्मांसमोर त्यांच्या पापकर्मांचा हिशोब चुकता केला जातो. परंतु भक्तांना आपल्या पापकर्मांचा हिशोब चुकता करण्यासाठी पुन्हा–पुन्हा या जगामध्ये यावे लागू नये, म्हणून सत्संगी हसत–हसत दु:खांचा स्वीकार करतात.

माझ्या जीवनातील एक घटना आहे. त्यावेळी मी खूनीचक येथील आश्रमात राहत होतो. एकदा मला खूप ताप आलेला. महाराज कृपाल दुसऱ्या दिवशी गंगानगर येथे येत असल्याचा निरोप घेऊन काही महाराजजींचे सेवक माझ्याकडे आले. माझी अवस्था पाहून, तसेच मला काही न सांगता, त्या प्रेमींनी मी आजारी असल्याची तार महाराजजींना पाठविली. त्यानंतर माझा ताप उतरला. सतगुरू सेवकाचे यथायोग्य कर्म स्वत:वर घेऊन, त्याची नक्कीच मदत करतात.

उद्धव भगवान कृष्णाचा भक्त होता. त्याने भगवान कृष्णास विचारले की, ज्याच्यावर परमात्मा कृपाळू होतो, त्या सेवकास परमात्मा काय देतो? भगवान कृष्णाने उत्तर दिले, ''ज्याच्यावर परमात्मा कृपाळू होतो त्यास परमात्मा आजारपण, बेरोजगारी किंवा इतरांद्वारे अपमानास्पद वागणूक देतो.'' पंजाबमधील माझा जमीनजुमला सोडून मी राजस्थानमध्ये आलो, त्यावेळी येथे पाण्याची सोय नव्हती. मी खूनीचक येथे काही जमीन विकत घेतली. नातलगांपैकी माझा एक भाऊ मला भेटावयास आला. मी खरेदी केलेली जमीन त्यास माझ्या सेवादारांनी दाखविली, जेणेकरून ती पाहून त्यास आनंद व्हावा. परंतु दिवसभरात त्याने कोणतीही प्रतिक्रिया दर्शविली नाही. अखेरीस सेवादार माझ्याकडे येऊन खेदाने म्हणाले की,''तुमच्या बंधुंनी एकही चांगला शब्द उच्चारला नाही.'' मी हसून म्हटले, ''मी चांगले केले असते तरच तो चांगले म्हटला असता ना!''

मी पंजाबमधील स्वत:चा चांगला जमीन-जुमला सोडून राजस्थानच्या वाळवंटी खेड्यामध्ये आलो आहे. जेव्हा खूनीचक येथे पाटाचे पाणी आले, मी चांगले घर बांधले आणि चांगले जीवन व्यतीत करू लागलो, तेव्हा माझी परमपिता कृपालजींशी भेट झाली. परमात्मा कृपाल मला म्हणाले, ''मी येथे असतानाच तू ही जमीन आणि घर सोडून दे. गुरे-ढोरे लोकांच्या मुलींना दान करून तू १६ पी.एस. येथे जाऊन ध्यान-अभ्यास कर.'' त्यामुळे माझ्या कुटुंबातील लोक माझ्यावर नाराज झाले. त्यांना वाटले माझे डोके ठिकाणावर नाही. कृपाल सिंहजींनी याच्यावर काहीतरी जादुटोणा केला आहे, नाहीतर इतके चांगले घर याने का बरे सोडले असते?

खरे प्रेमीजन, इतर लोकांच्या टोमण्यांची आणि दु:खाची पर्वा करीत नाहीत. ज्याप्रमाणे दिव्यातील ज्योतीचे काळपटलेले टोक कापल्यावर ती अधिक प्रकाशमान होते, त्याचप्रमाणे खऱ्या प्रेमींना तेव्हा दु:ख-संकटांना सामोरे जावे लागते तेव्हा ते त्यांच्या मनास समजवतात की ते तुझ्याच वाईट

कर्मांचे फळ आहे. तुझे दु:खं कमी होत आहे, तू नामाचा जप कर. खरे प्रेमी कधीच गुरूंवरील स्वत:च्या प्रेमास तडा जाऊ देत नाहीत. गुरु सेवकास योग्य ती मदत नक्कीच करतात. त्याच्या कर्मांच्या परतफेडीतील सूळावर चढण्याची सजा कमी करून त्यास केवळ काटा टोचण्याइतकीच सजा भोगावयास लावतात.

महाराज सावन सिंहजी सैन्यामध्ये असताना घोड्यावरून पडले. त्यावेळी त्यांचा पायास गंभीर दुखापत झाल्याने त्यांना खूप वेदना झाल्या. बाबा सावन सिंहजी बीबी रूक्कोस म्हणाले की, सावन सिंहवर खूप मोठे संकट येणार होते. त्यांना पाच वर्षे दु:ख भोगावे लागणार होते परंतु स्वामीजींनी कृपा करीत ते दु:ख पाच महिन्यामध्येच संपविले. सतगुरु आपल्यावर किती कृपा वर्षाव करतात. परंतु तरीही आपण किती कृतघ्न असतो, आभारदेखील व्यक्त करीत नाही व एखाद्या कठीण समयी आपला सतगुरुंवरील विश्वास देखील ढासळतो.

जीवनात आपणांस केवळ सुखच मिळावे किंवा दु:खच भोगावे लागावे म्हणून आपण संतमतामध्ये पदार्पण करीत नाही. संत आपणांस सुख–दु:खांच्या पलिकडे जाण्याची पद्धत दर्शवितात, आपल्या स्वगृही, सचखंडास जाणाचा मार्ग दाखवितात. तेथे सुखं–दु:खं, जन्म–मृत्यु नाही, तो तर शांतीचा देश आहे. संत आपणांस ना स्वर्गाचे आमिष दाखवितात ना नरकाची भिती घालतात. कबीर साहेब सांगतात :

क्या नर्क क्या स्वर्ग संतन दोऊ रादे।
हम काहूँ की कान न कडदे अपने गुर परसादे।।

***

दलदल

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी गोष्टीरुपात
प्रेमींना दिलेला अनमोल संदेश

एकदा राजा भोजच्या राज दरबारात एक जिज्ञासु मनुष्य आला. त्याने प्रश्न विचारला, ''अशी कोणती दलदल आहे की, जिच्यामध्ये अडकलेला मनुष्य बाहेर निघू शकत नाही?'' राजा भोज स्वत: संस्कृत पंडित होता. त्याच्या दरबारामध्येही अनेक विद्वान पंडित होते. त्याने सर्वांना वरील प्रश्नाचे उत्तर विचारले असता, प्रत्येकाचे मत निरनिराळे होते. राजा भोजच्या दृष्टीने सर्वात विद्वान असलेल्या पंडितास आठ दिवसाची मुदत देत त्यास राजाने सांगितले की, तू जर या प्रश्नाचे बरोबर उत्तर दिले नाहीस, तर तुला तुझ्या पदावरून बेदखल केले जाईल.

तो पंडित जंगलामध्ये गेला. तेथे त्यास एका सत्संगी भेटला. त्या सत्संगीने पंडितास विचारले, ''पंडितजी! तुम्ही इतके अस्वस्थ का आहात?'' त्यावर पंडिताने त्यास संपूर्ण पार्श्वभूमी समजावून सांगितली व म्हणाला, ''राजाने मला प्रश्नाचे उत्तर मागितले आहे की अशी कोणती दलदल आहे, जिच्यामध्ये अडकलेला मनुष्य बाहेर येऊ शकत नाही?''

तो सत्संगी समजुतदार होता. तो म्हणाला, ''मी तुझ्या या प्रश्नाचे उत्तर देतो. माझ्याकडे एक पारस आहे, त्याचा अंगभूत असा गुण आहे की, त्याचा लोखंडास स्पर्श झाल्यास त्या लोखंडाचे सोने बनते. माझा विवाह झाला नसल्याने, मला मुल-बाळ नाही. हा पारस मी तुला देतो, त्यामुळे तुला राजाकडे नोकरी करण्याची गरज नाही. तुझ्या मुला-बाळांचा त्यापासून आरामात उदरनिर्वाह होईल. परंतु कुणाकडून एखादी शिकवण घ्यायची झाल्यास, त्याचे शिष्य बनावे लागते. तू माझा शिष्य बन.''

तो पंडित आनंदित झाला आणि त्याने त्या सत्संगीचे म्हणणे मान्य केले. तेव्हा सत्संगी म्हणाला, ''तू माझ्या मेंढीचे दूध प्यायलास तर मी तुला



माझा शिष्य बनवीन.'' तेव्हा तो पंडित म्हणाला, ''मी तर पंडित आहे. मेंढीचे दूध मी कसे बरे पिऊ शकेन?'' तो सत्संगी म्हणाला, ''मग मी तुला पारस देणार नाही.''

त्या पंडिताने विचार केला की, पारस बहुगुणी असून त्याचा उपयोग करून सोने बनविता येते. मग आपल्या हातून एखादे पाप घडल्यास त्यात काय मोठे? आपण त्या पापाचे प्रायश्चित्त करून घेऊ. तो पंडित सत्संगीस म्हणाला, ''मी ते दूध पितो, तू मला पारस नक्की दे.''

आता सत्संगी म्हणाला, ''तुझी ती संधी तू गमावलीस. आता ते दूध अगोदर मी पिईन, मग ते माझा कुत्रा पिईल आणि त्यातून उरलेले दूध तुला प्यावे लागेल.'' तसे करण्यास पंडिताने नकार दिला. परंतु लगेच त्याने विचार केला असेही आपण पापाचे प्रायश्चित्त करणार आहोतच. मग दोन्ही पापांचे प्रायश्चित्त आपण एकत्रच करून टाकू. मग पंडिताने सत्संगीच्या म्हणण्यानुसार वागण्यास होकार दिला.

त्यावर सत्संगी म्हणाला, ''आता तुझी ही संधीदेखील गेली. आता मी कुत्र्याचे उष्टे दूध किडे पडलेल्या मानवी कवटीमध्ये टाकून तुला प्यावयास देईन. तू ते पिणार का?'' त्या पंडिताने त्वरित सत्संगीस विचारले, ''तू मला पारस देशील ना नक्की?'' सत्संगीने ते मान्य केले.

मानवी कवटीमध्ये टाकून जेव्हा दूध पंडितास पिण्यासाठी दिले असता, पंडिताने ते पिण्यास सुरुवात करणार तितक्यात त्यास सत्संगीने रोखले व म्हटले, ''दूध पिण्यापूर्वी तू माझे उत्तर ऐक. ते उत्तर म्हणजे हीच ती दलदल आहे, जिच्यामध्ये अडकलेला मनुष्य आयुष्यभर बाहेर येऊ शकत नाही. धनाच्या लोभामध्ये अडकलेला मनुष्य कोणत्याही प्रकारची चोरी, लबाडी, बेईमानी करण्यास तयार असतो.'' आता तो पंडित शांत झाला. महाराज सावन सिंहजी सांगत असत:

जिसको कछु न चाहिए सोई शहन्शाह।

***

धन्य अजायब



गुरुप्रेमी साधूसंगत,

परमसंत अजायब सिंह महाराजजींच्या कृपेने दरवर्षाप्रमाणे यंदाही दिल्ली येथे १९, २० आणि २१ मे २०१७ रोजी सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. सर्व सत्संगी बंधु–भगिनींना विनंती आहे की, निम्नलिखित पत्त्यावर पोहचून परमसंतांच्या सत्संगाचा लाभ घ्यावा.

कम्युनिटी हॉल,
भेरा एन्क्लेव्ह,पश्चिम विहार (पीरागढी चौकाजवळ),
नवी दिल्ली – ११००८७